मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरात साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सायबर फसवणुकीचे 269 गुन्हे दाखल

## ऑनलाइन फसवणुकीविरोधात पोलीस यंत्रणा सतर्क; नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन




**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मागील वर्षात खुनाच्या ६३ घटना घडल्या. त्यातील २१ खून प्रेमसंबंधातून, तसेच जुन्या भांडणातून सात खून झाले आहेत. एकीकडे खुनाच्या गुन्ह्यासह इतर गुन्ह्यात घट झाली असताना दुसरीकडे खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात मात्र गेल्यावर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे.

२०२४ मध्ये खुनाच्या प्रयत्नाचे १६८ गुन्हे दाखल होते. २०२५ मध्ये १९४ गुन्हे घडले आहेत. बलात्काराच्या ३०१ घटना घडल्या असून विनयभंगाचे ३९२ गुन्हे दाखल आहेत. मागील वर्षभरात सहा हजार ९०४ विविध गुन्हे दाखल झाले आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत गुन्हेगारीत घट झाल्याचा दावा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पत्रकार परिषदेत केला.

पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वार्षिक कामगिरीची माहिती पोलीस आयुक्त चौबे यांनी बुधवारी दिली. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, बसवराज तेली यावेळी उपस्थित होते.

चौबे म्हणाले, '२०२५ मध्ये खुनाच्या घटनेत २२.८५ टक्क्यांनी घट झाली. ६३ खून झाले आहेत, तर २०२४ मध्ये हाच आकडा ८५ होता. खुनाच्या प्रयत्नाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, १९४ घटना घडल्या आहेत. विनयभंगाच्या ३९२ घटना घडल्या असून, त्यातील परिचित व्यक्तीकडून विनयंभग झाल्याच्या ३७६ घटना आहेत. बलात्काराच्या ३०१ घटनांची नोंद झाली आहे. यामध्ये २९९ परिचित व्यक्तींकडून आणि त्यापैकी लग्नाच्या आमिषाने १२० घटना घडल्या आहेत. दरोड्याच्या गुन्ह्यात घट झाली असून, २० गुन्हे दाखल आहेत. जबरी चोरीच्या १८२, सोनसाखळी चोरीच्या ७५ घटना घडल्या आहेत. घरफोडीच्या २८५ घटनांची नोंद झाली आहे. वाहनचोरीचे ९०६ गुन्हे घडले आहेत. २४३ पिस्तूल आणि ९०८ धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मागील दोन वर्षांच्या तुलनेत आयुक्तालयाच्या हद्दीतील गुन्हेगारीत घट झाल्याचा दावा आयुक्त चौबे यांनी केला.

### संवेदनशील १०४५ ठिकाणी पोलिसांची गस्त

गेल्यावर्षी ४५ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील २१३ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली. ३५ गुन्हेगार स्थानबद्ध, तर ३६८ गुन्हेगार तडीपार केले आहेत. एका वर्षात पाच हजार ८१८ अवैध धंद्यांबाबत गुन्हे नोंदवून १६ कोटी ३७ लाख ११ हजार ४८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुन्हे कमी होण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवायांसह पोलीस गस्त वाढविली. एक हजार ४५ संवेदनशील ठिकाणे निश्चित करून तिथे सातत्याने पोलीस गस्त वाढविली.

### सायबर फसवणुकीच्या 112 गुन्ह्यांची उकल

» आयुक्तालयाच्या हद्दीत सायबर फसवणुकीचे २६९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील ११२ गुन्हे उघडकीस आले असून, २१५ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून २४ कोटी ३८ लाख ५९ हजार ८४२ रुपये वसूल करून संबंधित नागरिकांना परत केले आहेत.

सायबर फसवणुकीच्या 112 गुन्ह्यांची उकल

» आयुक्तालयाच्या हद्दीत सायबर फसवणुकीचे २६९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील ११२ गुन्हे उघडकीस आले असून, २१५ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून २४ कोटी ३८ लाख ५९ हजार ८४२ रुपये वसूल करून संबंधित नागरिकांना परत केले आहेत.

### वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून ३३ कोटींचा दंड वसूल

मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या चार हजार ५८० वाहन चालकांकडून, फॅन्सी नंबर प्लेट ५६ हजार २४३, एका दुचाकीवरून तिघांनी (ट्रीपलसीट) प्रवेश केल्याप्रकरणी ७४ हजार ५१२, जड-अवजड एक लाख २ हजार ७२९ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. वाहनांना काळी काच लावणाऱ्या ४० हजार ४२० आणि दुचाकींना सायलेन्सर बसविणाऱ्या १३ हजार ७९० जणांवर कारवाई केली. या सर्वांकडून ३२ कोटी ८४ लाख ९० हजार ७२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# 15 जानेवारीला महापालिका क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर

## आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांची माहिती




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून सदर सार्वजनिक सुट्टी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात लागू राहणार आहे.

सदर सार्वजनिक सुट्टी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील केंद्र व राज्य शासनाची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका आदींना लागू राहील. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदार जर शहराबाहेर कार्यरत असतील, तरी त्यांनाही मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ही सार्वजनिक सुट्टी लागू राहणार आहे. तरी १५ जानेवारी २०२६ या सुट्टीच्या दिवशी प्रत्येक मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची किवळेत जाहीर सभा

## महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ किवळेत शक्तिप्रदर्शन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील शिवसेना पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज (शुक्रवारी) जाहीर सभा होणार आहे. किवळेतील मुकाई चौक येथील मुक्ता मैदान येथे दुपारी साडेतीन वाजता ही जाहीर सभा होणार आहे. याबाबतची माहिती शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.




खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक शिवसेना पूर्ण ताकदीने लढत आहे. ६० ठिकाणी पक्षाचे उमेदवार आहेत. जोरदार प्रचार सुरू आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावले. प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना साडेबारा टक्के परतावा मिळवून दिला. हा प्रश्न कोणीच सोडविण्याचे धाडस केले नाही. एकनाथ शिंदे यांनी हा प्रश्न सोडविला. अनधिकृत बांधकामावरील शास्तीकर माफीचा निर्णय घेतला. ५०० कोटी रुपये दंड नागरिकांचा माफ केला. हा धाडसी निर्णय एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना घेतला. शहरासाठी वाढीव पाणी आणण्याकरिता उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लवकरच मुळशी धरणातील पाणी कोटा मंजूर होईल. त्यामुळे शहरातील नागरिकांनी शिवसेना उमेदवारांना साथ द्यावी.

किवळे येथे होणाऱ्या जाहीर सभेला पक्षाचे सर्व उमेदवार उपस्थित राहणार आहेत. संघटनेचे पदाधिकारी, शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने जाहीर सभेला उपस्थित रहावे, असे आवाहन खासदार श्रीरंग बारणे यांनी केले.




# फ्लॅश मॉब व पथनाट्यातून मतदानाचा जागर

## उद्योगनगरीत लोकशाहीचा उत्सव, टाटा मोटर्समध्ये मतदानाची शपथ

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत आहे. राज्य सरकारच्या औद्योगिक विभागाने त्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे. या सुट्टीचा उपयोग सर्वप्रथम मतदानासाठी करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी व्यक्त केले.



लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वीप अंतर्गत राबवण्यात येत असलेल्या मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत आज पिंपरी येथील टाटा मोटर्स कंपनीमध्ये भव्य मतदान शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी त्या बोलत होत्या. भारतरत्न जे. आर. डी. टाटा व रतन टाटा यांना अभिवादन करून सुरू करण्यात आलेल्या या मतदान शपथ कार्यक्रमात टाटा मोटर्स कंपनीतील अधिकाऱ्यांसह सुमारे ३ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी मतदानाची शपथ घेत उत्स्फूर्तपणे लोकशाही उत्सवात सक्रिय सहभाग घेण्याचा व १००% मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह टाटा मोटर्सचे व्यवस्थापन अधिकारी आनंद लपारकर, आनंद आगाशे, डॉ. संतोष जाधव, अतुल आहिर, नितीन कदम तसेच कंपनीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन अण्णा बोदडे यांनी मानले.

### फ्लॅश मॉब व पथनाट्याने जिंकली मने

» मतदान जनजागृतीसाठी यावेळी लहान मुलांकडून सादर करण्यात आलेल्या फ्लॅश मॉबने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणाचे कंपनीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मनापासून कौतुक करत मुलांना छोटी भेटवस्तू देऊन प्रोत्साहन दिले. याचबरोबर मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे पथनाट्य सादर करण्यात आले, ज्यातून नागरिकांनी मतदान का करावे, याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

“ टाटा मोटर्ससारख्या मोठ्या औद्योगिक संस्थेत घेतलेला मतदान शपथ कार्यक्रम हा संपूर्ण शहराला लोकशाही सहभागाचा संदेश देणारा ठरला आहे. सुदृढ, सक्षम आणि उत्तरदायी लोकशाहीसाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे ही केवळ जबाबदारी नसून ती लोकशाहीप्रतीची कर्तव्यभावना आहे.

- अण्णा बोदडे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# वाहतूक कोंडी, आयटीतील कपात निवडणुकांच्या तोंडावर मुद्दे ऐरणीवर

## हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमुळे देशाच्या नकाशावर पुण्याचे नाव आयटीनगरी म्हणून कोरले गेले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमुळे देशाच्या नकाशावर पुण्याचे नाव आयटीनगरी म्हणून कोरले गेले आहे. देशातील सॉफ्टवेअर निर्यातीतही हाच आयटी पार्क आघाडीवर आहे. असे असताना गेल्या काही वर्षात आयटी पार्कमधील नागरी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. आता महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयटीयन्सनी त्यांचा जाहीरनामा मांडला असून, आयटी पार्क जागतिक दर्जाचा करण्याची मागणी केली आहे.

आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फोरम फॉर आयटी एम्प्लॉईजने या संघटनेने हा जाहीरनामा मांडला आहे. संघटनेने म्हटले आहे की, पुण्यातील सर्वच आयटी पार्कमध्ये जागतिक दर्जाच्या नागरी सुविधा द्याव्यात. खराब रस्ते, असुरक्षित सार्वजनिक वाहतूक, वीजपुरवठा खंडित होणे आणि नागरी सुविधांकडे दुर्लक्ष या गोष्टींवर तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. आयटी कर्मचारी हे देशाच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. त्यामुळे त्यांना चांगल्या दर्जाच्या पायाभूत सुविधा देणे आवश्यक आहे. आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणाची गंभीर समस्या आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य, उत्पादकता आणि कौटुंबिक आयुष्य यावर परिणाम होत आहे. त्यामुळे वाहतुकीचे योग्य नियोजन, हरित क्षेत्र निर्मितीसह शाश्वत नागरी विकासाची पावले उचलावीत.



### आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात

» आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात सुरू आहे. खर्चात कपातीच्या नावाखाली कंपन्यांकडून हे प्रकार सुरू आहेत. कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांची होणारी पिळवणूक थांबायला हवी. याचवेळी कंपन्यांकडून पार्श्वभूमी तपासण्याच्या नावाखाली कर्मचाऱ्यांचा छळ केला होता. तसेच, कर्मचाऱ्यांना धमकावणे आणि त्यांना काळ्या यादीत टाकणे असे प्रकारही घडतात. यासाठी कठोर नियमावली, पारदर्शक प्रक्रिया आणि कठोर शिक्षा असायला हवी. कर्मचाऱ्यांचे जबरदस्तीने राजीनामे, बेकायदा कामावरून काढून टाकणे आणि कपात या अनुचित प्रकारांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समिती नेमावी.

आयटी कर्मचाऱ्यांना नोकरीची सुरक्षितता वाटत नसल्याने कायम ते मानसिक तणावाखाली आहेत. यातून काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आहे. सरकारने वेळीच पावले न उचलल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर बनू शकते, असा इशारा फोरमने दिला आहे.

आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात सुरू आहे. खर्चात कपातीच्या नावाखाली कंपन्यांकडून हे प्रकार सुरू आहेत. कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांची होणारी पिळवणूक थांबायला हवी. याचवेळी कंपन्यांकडून पार्श्वभूमी तपासण्याच्या नावाखाली कर्मचाऱ्यांचा छळ केला होता. तसेच, कर्मचाऱ्यांना धमकावणे आणि त्यांना काळ्या यादीत टाकणे असे प्रकारही घडतात. यासाठी कठोर नियमावली, पारदर्शक प्रक्रिया आणि कठोर शिक्षा असायला हवी. कर्मचाऱ्यांचे जबरदस्तीने राजीनामे, बेकायदा कामावरून काढून टाकणे आणि कपात या अनुचित प्रकारांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समिती नेमावी. आयटी कर्मचाऱ्यांचे हितरक्षण करण्यासाठी धोरण आखावे, असे फोरमने नमूद केले आहे.

### आत्महत्येचा मुद्दा ऐरणीवर

» आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात मानसिक ताण आहे. हा ताण वेळेपेक्षा जास्त काम, जबरदस्तीने राजीनामे, कपात यासह इतर गोष्टींचा आहे. आयटी कर्मचाऱ्यांना नोकरीची सुरक्षितता वाटत नसल्याने कायम ते मानसिक तणावाखाली आहेत. यातून काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आहे. सरकारने वेळीच पावले न उचलल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर बनू शकते, असा इशारा फोरमने दिला आहे.

> आयटी कर्मचारी हे सर्वप्रथम देशाचे नागरिक आहेत. त्यांचे मूलभूत अधिकार, कामगार म्हणून प्रतिष्ठा, नोकरीची सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षा याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. न्याय आणि प्रतिष्ठेशिवाय कोणताही विकास होऊ शकत नाही. आयटी कर्मचाऱ्यांशिवाय डिजिटल इंडिया साकार होऊ शकत नाही. त्यामुळे या निवडणुकांच्या निमित्ताने सरकारने आमच्या न्याय्य मागण्यांकडे लक्ष द्यावे.-
>
> \- प्रशांत पंडित, सचिव, फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज

# पुणे मेट्रो लाईन 3 चा ट्रायल रन यशस्वी; माण डेपो ते विद्यापीठ चौक दरम्यान मेट्रोची धाव

## हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो आता प्रत्यक्षात धावण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले असून यामुळे निर्णायक टप्पा गाठला जाणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी 'आयटी-हब'ला शहराशी जोडणाऱ्या 'पुणे मेट्रो लाईन ३' (हिंजवडी – शिवाजीनगर) प्रकल्पावरील मेट्रोची आज (८ जानेवारी) सकाळी ८ वाजता माण डेपो ते पुणे विद्यापीठ चौक या दरम्यान मेट्रोची तांत्रिक चाचणी (ट्रायल रन) यशस्वीपणे पार पडली. या चाचणीमुळे हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो आता प्रत्यक्षात धावण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले असून यामुळे निर्णायक टप्पा गाठला जाणार आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सार्वजनिक, खासगी, भागीदारी (पीपीपी) तत्वानुसार पीएमआरडीए, टाटा समूह आणि पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड यांच्या माध्यमातून हिंजवडी ते शिवाजीनगर अशा २३.३ किलोमीटर उन्नत मार्गिका प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या मार्गिकेवर जुलै २०२५ मध्ये माण डेपो ते पुणे विद्यापीठ दरम्यान पहिली चाचणी घेण्यात आली होती. त्यानंतर त्यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये माण डेपो ते बालेवाडी क्रीडा संकुलपर्यंत चाचणी घेण्यात आली. गेल्या तीन दिवसांपूर्वी चाचणी घेण्यात आली असून यामध्ये तंत्री बिघाड समोर आला होता. आज सकाळपासून ठराविक अंतराच्या टप्प्यांवर चाचण्या घेण्यास सुरुवा झाली. या चाचण्यांमध्ये निर्माण झालेले तांत्रिक बिघाड रिसर्च डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनच्या (आरडीएसओ) माध्यमातू दूर करण्यात आले आहे.




प्रामुख्याने मार्गिकेवरील सुरक्षितता आणि तांत्रिक तपासणी, लोहमार्ग (ट्रंक) जिओमेट्री, वीज पुरवठा, आपत्कालीन ब्रेकिंग, कोच स्थिरता आणि वक्रांवरील कामगिरी यांचा अभ्यास करण्यात आला. उच्च गतीवर कंपन आणि हालचाली सुरक्षित मर्यादेत असल्याचे यावेळी तपासण्यात आले असून विनाअडथळा ही चाचणी यशस्वी पार पडल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे आता पुढील टप्प्यातील चाचण्या आणि प्रवासी सेवेसाठी मार्ग मोकळा झाला आहे.

> या मेट्रो प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. स्थानकांच्या इमारती, प्लॅटफॉर्म, प्रवेश-निर्गमन सुविधा तसेच अत्यावश्यक सेवा जवळपास पूर्णत्वास आल्या आहेत. ३१ मार्चपर्यंत बहुतांश स्थानके प्रवाशांसाठी खुली करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या मेट्रो गाड्यांचा (रोलिंग स्टॉक) पुरवठा झाला आहे. १० पेक्षा अधिक रेक मेट्रोला मिळाले आहेत. मंजूर वेळापत्रकानुसार एकूण २२ रेक लवकरच उपलब्ध होणार आहेत. हा संपूर्ण प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधला जात आहे
>
> \- योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए

# पुण्यात दोन नवीन महापालिका उभारणार; अजित पवारांची ग्वाही

## राष्ट्रवादीची सत्ता आल्यास हडपसर आणि चाकण परिसरासाठी स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याची ग्वाही अजित पवार यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

'शहराचा विस्तार चारही दिशांना होत असून लोकसंख्येतही वाढ होत आहे. सध्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमधील वाढती लोकसंख्या पाहता पुणे जिल्ह्यात दोन नवीन महापालिका होऊ शकतात. महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेवर आल्यास दोन महापालिका केल्या जातील,' अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी दिली. ठाणे जिल्ह्यात सहा महापालिका झाल्या असून त्या तुलनेत पुणे जिल्ह्यात दोन नवीन महापालिकांची आवश्यकता असल्याचेही पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पवार म्हणाले, 'शहराचा विस्तार वाढत आहे. हडपसरच्या पुढील भागांचा समावेश करून एक महापालिका आणि चाकण, आळंदी, वाघोली या परिसरासाठी आणखी एक महापालिका अशा दोन महापालिका करणे आवश्यक आहे. महापालिकेत सत्ता आल्यास त्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. महापालिकेच्या हद्दीतून वगळून उरुळी, फुरसुंगी या दोन गावांसाठी नगरपरिषद करण्यात आली. राज्य सरकारने हा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयामुळे तेथील नागरिक समाधानी आहेत, असे वाटत नाही. महापालिका करण्याचे ठरल्यास ही दोन गावे देखील महापालिकेत येऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांमधील कारभारी; तसेच प्रशासन नागरिकांचे प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरले आहेत. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी 'अलार्म' मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

भाजपवर केलेल्या टीकेमुळे भाजपचे वरिष्ठ नेते नाराज झाले असून राज्यातील युती तोडणार असल्याचा इशारा भाजपच्या नेत्यांनी दिला आहे, याबाबत विचारण्यात आले असता, पवार म्हणाले,'या विषयावर मी काहीही बोलणार नाही. राज्यातील युती तुटते का राहते, याचा निर्णय १६ जानेवारीच्या निकालानंतर होईल. तोपर्यंत जरा कळ काढा, शहराचा विस्तार चारही दिशांना होत असून लोकसंख्येतही वाढ होत आहे. सध्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमधील वाढती लोकसंख्या पाहता पुणे जिल्ह्यात दोन नवीन महापालिका होऊ शकतात.



### आरोप-प्रत्यारोपांबाबत अजित पवारांचे मौन

» महानगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी आणि प्रशासनाला जाग आणण्यासाठी 'अलार्म' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. 'एक अलार्म, पाच काम' ही या योजनेची संकल्पना आहे. त्यामध्ये पाच नागरी समस्यांबाबत नागरिकांमध्ये जागृती केली आहे. त्यावर आधारित गीत तयार करण्यात आले असून, त्याचे अनावरण बुधवारी करण्यात आले. हे गीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात प्रचार काळात मतदारांना ऐकवले जाणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

### 'अलार्म' मोहिमेचे गीत

» महानगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी आणि प्रशासनाला जाग आणण्यासाठी 'अलार्म' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. 'एक अलार्म, पाच काम' ही या योजनेची संकल्पना आहे. त्यामध्ये पाच नागरी समस्यांबाबत नागरिकांमध्ये जागृती केली आहे. त्यावर आधारित गीत तयार करण्यात आले असून, त्याचे अनावरण बुधवारी करण्यात आले. हे गीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात प्रचार काळात मतदारांना ऐकवले जाणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

### 'एक अलार्म, पाच काम'

- » पाणी: २४ बाय ७ स्वच्छ पाणी पुरवठ्याची हमी
- » रस्ते आणि वाहतूक : खड्डेमुक्त आणि दर्जेदार रस्ते
- » स्वच्छता : वेळेवर कचरा संकलन आणि संपूर्ण स्वच्छता
- » सार्वजनिक जागा आणि प्रदूषण निर्मूलन : सर्व वयोगटातील लोकांसाठी राखीव क्रीडांगणे आणि विरंगुळा पार्क आणि प्रदूषण नियंत्रण.
- » आरोग्य: प्रत्येक प्रभागात सुसज्ज, सुलभ आरोग्य सुविधा

# निळुंजच्या विकासासाठी आमदार शिवतारे सरसावले; शिवरकर वस्तीला मिळाला हक्काचा रस्ता

## बेलसर-निळुंज रोड ते शिवरकर वस्ती या 15 लाख रुपयांच्या रस्ते कामाचे रमेश इंगळे यांच्या हस्ते भूमिपूजन

**पुणे | प्रतिनिधी**

निळुंज गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून गावातील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी माजी मंत्री व आमदार विजय शिवतारे यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन माजी नियोजन समिती सदस्य रमेश इंगळे यांनी केले. बेलसर- निळुंज रोड ते शिवरकर वस्ती या १५ लाख रुपये मंजूर निधी असलेल्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन रमेश इंगळे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. हा रस्ता वस्ती परिसरासाठी महत्त्वाचा असून त्यामुळे नागरिकांना वाहतुकीची मोठी सोय होणार आहे. शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना या रस्त्याचा थेट लाभ मिळणार असल्याचे इंगळे यांनी नमूद केले. गावातील पायाभूत सुविधांच्या विकासामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. निळुंज व वाळुंजचा परिसर हा शेतीप्रधान भाग असल्याने रस्ता झाल्यानंतर शेतमाल वाहतूक सुलभ होऊन उत्पादन खर्चात बचत होईल.

बाजारपेठेशी जोडणी अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.आमदार शिवतारे यांच्या नेतृत्वाखाली पुरंदर तालुक्यातील अनेक गावांमध्ये विकासकामांचा वेग वाढला असून निळुंज गावही त्या विकास प्रवाहात अग्रेसर राहील, असे इंगळे यांनी सांगितले. यावेळी रिसे पिसे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गणेश मुळीक, सरपंच अश्विनी बनकर, ग्रामपंचायत सदस्य समीर बनकर, रूपाली बनकर, माजी तंटामुक्ती अध्यक्ष अशोक बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सीताराम बनकर, अमोल बनकर, सुभाष ज्ञा. बनकर, सुभाष बनकर, उमेश बनकर, अर्जुन जाधव, स्वप्रिल शिवरकर, भगवान बनकर, सचिन बनकर, राजेंद्र राऊत, विजय राऊत, शरद बनकर, दीपक बनकर, आलका बनकर, सुभाष द. बनकर उपस्थित होते.



### गावाच्या प्रगतीत महत्त्वाचा टप्पा

» निळुंज गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून गावातील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी माजी मंत्री व आमदार विजय शिवतारे यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन माजी नियोजन समिती सदस्य रमेश इंगळे यांनी केले. ग्रामस्थांनी रस्ता कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. ग्रामस्थांनी आमदार विजय शिवतारे आणि रमेश इंगळे यांचे आभार मानले. विकासाची ही नवी सुरुवात गावाच्या प्रगतीत महत्त्वाचा टप्पा ठरेल, अशी भावना सरपंच अश्विनी बनकर यांनी व्यक्त केली.